120

UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

## Special Issue

Issue I, Vol II 10th February 2018

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Science College,Motala

121

ISSN : 2319 – 8648 CURRENT GLOBAL REVIEWER
Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I Vol II, 10th Feb. 2018

# Current Global Reviewer

UGC Approved International Research Refereed Multidiciplanary Journal

Editor In Chief
**Mr. Arun B. Godam**

SPECIAL ISSUE Issue I, Vol II, Published on 10th Feb., 2018

**Editorial Office Address :**
Khadgaon Road, Kapil Nagar, Latur, Dist. Latur 413512 (M.S.) India

Contact- 8149668999
Email- hitechresearch11@gmail.com

## EXECUTIVE EDITORS

**Dr. Chitta Ranjan Panda**
P.G. Deptt. Of Odia
Shailabala Women's Autonomous College, Cuttack – (Orissa)

**Prof. Helambe H.B.**
Head, Dept. of Public Administraion
R.B. Attal College, Georai
Dist. Beed

**Dr. U.T. Gaikwad**
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

**Prof. R.B. Kale**
Head, Dept. of Sociology
R.B. Attal College, Georai,
Dist. - Beed

**Maimanat Jahan Ara**
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr U.V.Panchal**
H.O.D, Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr M.U. Yusuf**
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Auranbadad, Dist. Aurangabad

**Pro. S.B. Karande**
Dept. of Economics,
Shri Bhausaheb Vartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

**Dr. Hanumant Mane**
R.Guide & Head,
Dept. of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

**Dr. Sachin Kadam**
Dept. of Hindi
Nagarpalika Art D.J. Malpani Comm. & B.N. Sarda Sci. College, Sangmner, Dist. Ahmadnagar (M.S.)

**Publisher**
**Shaurya Publication**
Kapil Nagar, Latur
Contact- 8149668999

**Rs. 400/-**

www.rjournals.co.in



Principal
Shri Shivaji Arts, Commerce & Science College, Motala

ISSN : 2319 – 8648 **CURRENT GLOBAL REVIEWER**
Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I Vol II , 10th Feb. 2018

**DECLARATION BY THE PUBLISHER**
ISSN 2319-8648
Conference Special **Issue I Vol. 2**
**Current Global Reviewer**

**PUBLISHED AT**
Shaurya Publication , Latur

**PUBLISHER**
Shaurya Publication, Latur, www.rjournals.co.in
Email: hitechresearch11@gmail.com

**EDITOR IN CHIEF**
Mr. Arun B. Godam

**NATIONALITY**
Indian

**COVER DESIGNING**
Mr. Arun B. Godam

**PRINTING**
Shaurya Offset Printing & Binding Pvt. Ltd

Views, idea and materials published in this proceeding are intellectual properties of author (s). Author(s) is/ are solely responsible for their publication and not the Editors, Principal or publisher.

© All right are reserved. No part of this publication may be reproduced, stored, retrieved or transmitted in any form, by any means, without the written permission from the **Mr. Arun B. Godam**, Shaurya Publication, Latur, Dist. Latur

**Mr. Arun B. Godam**
**Shaurya Publication, Latur** **10th February 2018**



Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Science College,Motala

123

CURRENT GLOBAL REVIEWER
ISSN : 2319 – 8648 Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I Vol II , 10th Feb. 2018



## Editoral Board Member

**Prof. helambe H.B.**
Dept. of Public Adm.
R.B. Attal College, Georai, Dist. Beed

**Dr. N.J. Waghmare**
Research Guide & Head,
Dept. of Pali,
Govt. Sanatketar College,
Shivani, (M.P. )

**Dr. Bharat Handibag**
Dean, Fculty of Arts,
Dr.B.A.M.University Aurangabd.(M.S.)

**Dr. U.T. Gaikwad**
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

**Pro. S.B. Karande**
Dept. of Economics,
Shri Bhausaheb Vartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

**B.J. Hirve**
Dept. of botany
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed. (M.S.)

**Dr. Gopal S. Bhosale**
Head, Dept. of Hindi,
Janvikas College,
Bansarola, Dist. Beed (M.S.)

**Dr. B.T. Lahane**
Principal, Head, Dept. of English,
Sambhajirao Kendre College,
Jalkot, Dist. Latur (M.S.)

**Dr U.V.Panchal**
H.O.D ,Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr M.U. Yusuf**
Assistant Professor,
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Auranbadad, Dist. Aurangabad

**S. R. Uchale**
Librarian,
Shri Bhausaheb Vartak College,
Borivali (W), Mumbai

**S.R. Kadam**
Head, Dept. of History,
Janvikas College,
Bansorala, Dist. Beed (M.S.)

**Dr. Gopal S. Bhosale**
Head, Dept. of Hindi,
Janvikas College,
Bansarola, Dist. Beed (M.S.)

**Dr. Hanumant Mane**
Research Guide & Head, Dept. of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

**Prof. Mohan S. Kamble**
Dept. of Marathi,
Janvikas Mahavidyalay,
Bansarola, Dist. Beed (M.S.)

**Prof.Chitade Nandkishor**
Dept. of Economics,
Janvikas Mahavidyalay,
Bansarola, Dist. Beed (M.S.)

**Dr.Koshidgewar Bhasker**
H.O.D (Computer Science)
Vai. D.M.Deglurkar College,
Degloor, Dt. Nanded (M.S)




for
Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Science College,Motala

124

**CURRENT GLOBAL REVIEWER**

ISSN : 2319 – 8648 Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I Vol II , 10th Feb. 2018



| Economics | | | |
|---|---|---|---|
| 1 | Trends and Patterns of Public Health Expenditure: A Study for the State Odisha, India | Susanta Nag | 194 |
| 2 | Globalization and Economic Growth in India | Dr. Mahadeo Yadav | 205 |
| 3 | Impact on GST on Various Sectors | Mr. Devidas Gokul Gavali | 208 |
| 4 | Globalisation and India's International Trade – A Study | Dr. N.V. Hodlurkar | 211 |
| 5 | "Reflections Of Globalization On Indian Agriculture" | Avinash Kamalakar Jumare ,<br>Suryawanshi Bhandaji Rangrao | 214 |
| 6 | Globalisation And Its Impact On Indian Economy | Nasiket G. Suryavanshi | 217 |
| 7 | Impact Of Globalisation On Indian Agriculture | Prof. Rakesh Bhoir | 220 |
| 8 | Economic Reforms and Agricultural Production in India | Sakshi ,<br>Susanta Nag,<br>Sonia Khajuria | 224 |
| 9 | जागतिकीकरण व भारतीय शिक्षण : संधी आणि आव्हाने | डॉ. सुरेश ए. घुमटकर<br>डॉ. माधव एच. शिंदे | 232 |
| 10 | जागतिकीकरण आणि भारतीय कृषी व्यवस्था | पी.आर.चाटे | 236 |
| 11 | जागतिकीकरणानंतर भारतीय कृषी क्षेत्र. | प्रा.बालासाहेब जोगदंड | 240 |
| 12 | जागतिकीकरण आणि नागरीकरण | डॉ. संजय काळे | 243 |
| 13 | जागतिकीकरण : विकास आणि विषमता | डॉ. मारोती तेगमपुरे | 247 |
| 14 | " जागतिकीकरण : एक सर्वव्यापी प्रक्रिया " | डॉ. नंदकिशोर मुळे | 250 |
| 15 | " जागतिकीकरण : समाज आणि संस्कृती " | भगवान .वि. शिंदे | 252 |
| 16 | जागतिकीकरणाचा भारतीय शिक्षणावरील परिणाम | मनिषा बाबुराव सुरासे | 254 |
| 17 | मराठवाडा आणि कोरडवाहु फळबाग | डॉ. डी.एन. जिगे | 257 |





For
Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Science College,Motala

**CURRENT GLOBAL REVIEWER**

ISSN : 2319 – 8648 Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I, Vol II , 10th Feb. 2018

# जागतिकीकरण आणि भारतीय कृषी व्यवस्था

**पी.आर.चाटे**

*अर्थशास्त्र विभाग प्रमुख व सहाय्यक प्राध्यापक, श्री.शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा, जि.बुलडाणा*

--------------(10)--------------

**प्रस्तावना :-**

प्रत्येक अर्थव्यवस्था विकासाच्या प्राथमिक अवस्थेत कृषीवर अवलंबून असते. हळू-हळू अर्थव्यवस्थांचा विस्तार होतांना कृषी क्षेत्राचा सकल राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी-कमी होत जातो. शेती क्षेत्राचा विकास म्हणजे शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा कमी होणे. आज जागतिकीकरणाचा स्विकार करुन भारतीय अर्थव्यवस्थेला जवळ-जवळ 30 वर्षांचा कालावधी पूर्ण होत आहे. संपूर्ण जगाचा विचार केला तरी असे लक्षात येते की, कृषी हा अतिशय व्यापक विषय आहे. भारताच्या संदर्भात कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. किंबहुना जागतिकीकरणाच्या स्विकारानंतर सर्वात जास्त चर्चेचा विषय आहे तो म्हणजे कृषी. भारत देशामध्ये 2011 च्या जनगणनेचा अभ्यास केल्यास 70% जनता ग्रामीण भागात वस्तव्याला असल्याचे दिसते. भारतीय शेतकऱ्यांच्या वर्गीकरणानुसार 80% शेतकरी अल्पभूधारक व सिमांत भूधारक या प्रकारात मोडतो. भारताच्या सकल घरगुती उत्पादनामध्ये 2015-16 नुसार शेती क्षेत्राचा वाटा 17.4% व 10.2% वाटा निर्यातीमध्ये आहे. जोपर्यंत कृषीचा विकास होणार नाही. तोपर्यंत देशाचा समातोल विकास साध्य होणार नाही. कारण जागतिकीकरणाच्या स्विकारानंतर जागतिक आर्थिक विषमता झपाट्याने वाढलेली दिसते. भारतात सुध्दा गिनी गुणांकाच्या सहाय्याने विचार करता प्रचंड प्रमाणात आर्थिक विषमता असल्याचे जाणवते. भारताचा विचार करता भारतातील काही महत्वपूर्ण उद्योगामध्ये शेतीतील उत्पादन कच्चा माल म्हणून वापरले जाते व त्याचप्रमाणे उद्योगातील तयार मालाला योग्य बाजारपेठ तेव्हाच मिळेल ज्या वेळी बहुसंख्येने असणारा कृषक वर्ग आर्थिक दृष्ट्या समृध्द होईल. कारण एन.एस.एस.ओ. च्या सर्वेक्षणानुसार 48.6% शेतकरी कर्जबाजारी आहेत. त्याचप्रमाणे 40% शेतकरी पर्याय नसल्यामुळे शेतीत टिकून आहे. जागतिकीकरणानंतर शेतकरी आत्महत्येचे लोण आपल्या देशात वाढीस लागल्याचे दिसते. जागतिकीकरणाच्या स्विकारापासुन द्वितीयक व तृतिय क्षेत्रात भरमसाठ गुंतवणूक वाढत गेली, मात्र प्राथमिक क्षेत्रातील गुंतवणूक मंदावलेली प्रकर्षाने जाणवते. कारण भारतामध्ये जागतिकीकरण स्विकारल्यानंतर व पूर्वीचा सुध्दा विचार केला तर सिंचनाची परिस्थिती असमाधानकारकच आहे. कृषी बाजारपेठा, शेतीमधील अनुदाने, संशोधने कृषी तंत्रज्ञान याबाबत उदासिन धोरण असल्याचे दिसते. आर्थिक महासत्ता म्हणून उदयाला येणाऱ्या देशासमोर शेतीसारखा यक्ष प्रश्न असल्यामुळे केवळ देशातील वा जागतिक पातळीवरील विविध संघटनांनी दिलेल्या आश्वासक गोष्टींवर वा निष्कर्षावर विश्वास ठेऊन आपण महासत्ता होणार नाही. कारण भारताचे माजी पंतप्रधान पंडीत नेहरु यांनी शेती संदर्भात असे म्हटले होते की, "बाकी सगळ्या बाबी थांबू शकतात, पण शेती अधिक काळ प्रतिक्षा करु शकत नाही." आज भारतीय शेतीला उत्पादन, उत्पादकता, तंत्रज्ञान या सोबतच हवामानबदल, नापिकी, तापमानवाढ, नैसर्गिक प्रकोप, नव-नविन धोरणे, करार व देश विदेशातील बदलती समीकरणे या सारख्या असंख्य पातळ्यांवर लढा द्यावा लागणार आहे.

**गृहिते :-**

1) जागतिकीकरणानंतर भारतीय कृषीमधील विविध स्थित्यंतरांचा अभ्यास करणे.

2) भारतीय कृषी मधील संधी व संकटांचा अभ्यास करणे.

**माहिती संकलन :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी लागणारी माहिती विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, वर्तमानपत्रे व सामाजिक आर्थिक सर्वे आणि शासनाची कृषी संबंधित विविध संकेतस्थळे यावरुन घेण्यात आलेली आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून अजूनही शेती हा विषय महत्वपूर्ण आहे. शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा, हरितक्रांतीमुळे देशा अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. अकुशल लोकांना सामावून घेणारे क्षेत्र एवढाच शेतीचा संकुचित अर्थ नाही तर अजुनही भारतातील बहुसंख्या जनता शेतीच्या आधारेच जगत आहे. आज लोकसंख्या वाढत असतांना, संघटित क्षेत्रात रोजगार घटत असतांना, सेवा क्षेत्राच्या विस्ताराला मंदी आली असतांना, कृषी विचारवंतांच्या मताप्रमाणे शेतीमधील रोजगार संधी कमी झाल्या आहेत हे म्हणतांना देखील एक गोष्ट निर्विवाद सत्य आहे ती म्हणजे भारतीय शेतीचा संबंध भारतातील गरिबीशी आणि



Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Science College,Motala

CURRENT GLOBAL REVIEWER
ISSN : 2319 – 8648 Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I, Vol II, 10th Feb. 2018

गरिबांशी थेट जुळलेला आहे. जागतिकीकरणाचे होणारे बरे-वाईट परिणाम केवळ भारतीय शेतकऱ्यांच्या दृष्टीने नव्हे, तर भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्वाचे ठरतात.

**भारतीय शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील व रोजगारातील वाटा :-**

| वर्षे | राष्ट्रीय उत्पन्नात कृषीचा वाटा | रोजगारातील कृषीचा वाटा |
|---|---|---|
| 1990-91 | 34.00% | -- |
| 1999-2000 | 25.00% | 59.9% |
| 2007-08 | 17.8% | --- |
| 2004-05 | मधील किमतीवर आधारीत | 56.7% |
| 2008-09 | 15.7% | --- |
| 2009-10 | 14.7% | 53.3% |
| 2010-11 | 14.5% | --- |
| 2011-12 | 13.9% | 48.8% |
| 2012-13 | 13.6% | --- |

स्त्रोत :- डॉ.जी.एन.झामेर सुधारीत आवृत्ती 2016 व एन.एस.एस.ओ. अहवाल

जागतिकीकरणापूर्वी शेती क्षेत्राचा विकास दर जवळपास 3.5% च्या दरम्यान होता. जागतिकीरणानंतर उत्तरोत्तर यामध्ये घट होत असल्याचे दिसते.वरील तक्त्यावरुन भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा झपाट्याने कमी होतांना दिसतो. मात्र शेतीवरील रोजगाराचे अवलंबित्व अतिशय धिम्या गतीने कमी होतांना जाणवते. कृषीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी होत जाणे हे प्रगतशील राष्ट्राचे लक्षण आहे. परंतु त्या तुलनेत इतर क्षेत्रात रोजगाराचे समायोजन होणे आवश्यक असते नाही तर हा विकास 'जॉब लेस ग्रोथ' या संज्ञेमध्ये मोडतो.

**जागतिकीकरणानंतर भारतीय विकास दर व गुंतवणूक :-**

भारतीय अर्थव्यवस्था खाजगीकरण उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या दिशेने मार्गक्रमण होतांना शेती क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणूकीवर नकारात्मक परिणाम झालेला दिसतो. कारण जागतिकीरणानंतर कृषी विकासदरात झपाट्याने घट झालेली आहे. शिवाय काही वर्ष हा विकास दर उणेदेखील **राहिलेला दिसतो. या संदर्भात तपशीलवार आकडेवारी पुढील प्रमाणे :-**

| वर्ष | कृषी विकास दर |
|---|---|
| 1991-1995 | 2.4% |
| 1998-2003 | 2.9% |
| 2004-2007 | 3.8% |
| 2005-2013 | 3.7% |
| 2014-2017 | 1.9% |

Source :- CSO Govt of India

**\सार्वजनिक व खाजगी गुंतवणूक एकुण GDP च्या**

| वर्ष | सार्वजनिक गुंतवणूक | खाजगी गुंतवणूक |
|---|---|---|
| 1990-91 | 2.24% | 5.12% |
| 1994-95 | 2.12% | 4.48% |
| 1999-2000 | 1.66% | 4.56% |
| 2005-2006 | 1.94% | 6.81% |

Source :- CSO Govt of India

शेती क्षेत्र मागासलेले राहण्याचे मुख्य कारण म्हणजे सार्वजनिक गुंतवणूकीत झालेली घट होय. जागतिकीकरणानंतर कृषी क्षेत्राचा विकास दर कमी होत जाणे हे अर्थव्यवस्थेच्या सुदृढतेचे लक्षण नाही. तसेच कृषीच्या मागासलेपणाला या क्षेत्रामधील सार्वजनिक व खाजगी गुंतवणूकीत झालेली घट जबाबदार आहे. जागतिक स्पर्धेमध्ये उतरण्याअगोदर भारतीय शेती व्यवसायाची कवचकुंडले प्रगतशील राष्ट्राच्या षडयंत्राद्वारे पध्दतशीरपणे कमी करण्यात आली.



Principal
Shri Shivaji Arts,Commerce & Science College,Motala

**CURRENT GLOBAL REVIEWER**

ISSN : 2319 – 8648 Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I, Vol II , 10th Feb. 2018

**विविध देशातील प्रमुख पीकांचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता यांचा भारतीय शेती क्षेत्रासोबत तुलना :-**

| देश | क्षेत्र लाख हेक्टर्स | उत्पादन लाख टन | कि.ग्रॅ. प्रतिहेक्टर |
|---|---|---|---|
| | **तांदुळ** | | |
| जग | 1543.24 | 6346.06 | 4112 |
| भारत | 437 | 135.1 | 3124 |
| चीन | 293.8 | 1840.7 | 6225 |
| अमेरिका | 11.4 | 87.87 | 7694 |
| रशिया | 1.5 | 6.8 | 4394 |
| | **गहु** | | |
| जग | 2161 | 6059.5 | 2804 |
| भारत | 264.8 | 693.5 | 2619 |
| चीन | 234.5 | 1044.7 | 4455 |
| अमेरिका | 202.8 | 573 | 2825 |
| रशिया | 230 | 450 | 1953 |
| | **मका** | | |
| जग | 1444 | 6952 | 4812 |
| भारत | 76 | 147 | 1938 |
| चीन | 271 | 1456 | 5365 |
| ब्राझील | 126 | 426 | 3383 |
| | **ऊस** | | |
| जग | 204 | 13924 | 68257 |
| भारत | 42 | 2812 | 67 |
| चीन | 12 | 1007 | 82.5 |
| अमेरिका | 3.6 | 268 | 74 |
| | **तंबाखू** | | |
| जग | 39 | 67 | 1724 |
| भारत | 3.7 | 5.5 | 1486 |
| चीन | 13.8 | 27.5 | 19.97 |
| अमेरिका | 1.3 | 3.4 | 2497 |

**स्त्रोत :- योजना जानेवारी 2011 प्र.क्र.35, 36**

जगातील प्रमुख देशामधील खाद्यान्न व व्यापारी पीकांच्या उत्पादन व उत्पादकेतेची तुलना भारतीय शेतीच्या उत्पादकतेबरोबर केली आहे. यामध्ये गहु, तांदूळ, मका, ऊस आणि तंबाखू या प्रमुख पाच पीकांचा समावेश करण्यात आला आहे. जागतिकीकरणानंतर भारतीय शेतीच्या उत्पादकतेत निश्चितपणे सुधारणा झाली, परंतु जागतिक उत्पादकता व जगातील विविध देशांमधील उत्पादकतेशी तुलना केली असता भारताची शेती उत्पादकता कमी असल्याचे दिसून येते. यामध्ये भारत देशामध्ये कृषी निविष्ठा, जमीनीचेअपखंडन, भांडवलाचा अभाव, सिंचन सुविधांची कमतरता इत्यादी समस्यांमुळे जागतिकीकरणानंतर देखील उत्पादकतेत समाधानकारक बदल करण्यात आपण कमी पडलो असे जाणवते.

जागतिकीकरणानंतर भारतीय शेती क्षेत्रात बदल होण्यास सुरुवात झाली. परंतु बदलांची ही कासव गती बदलणे आवश्यक आहे. जागतिकीरणाच्या स्पर्धेत गरज आहे “ती पिकतय ते विकण्यापेक्षा विकतय ते पिकवण्यावर भर देण्याची.” त्या करीता शेतीला असणाऱ्या असंख्य बंधनातून मुक्त करणे गरजेचे आहे. शेतीमध्ये प्रगती साधावयाची असल्यास कृषी विपणनाचे धोरण, शेतमालांच्या किंमतीबाबतचे धोरण, शेतमाल साठवणूकीच्या सुविधा, कृषी पुरक उद्योग, प्रक्रिया उद्योग यांना चालना देणे गरजेचे आहे. जगाच्या पाठीवर असंख्स देश आहेत त्यामध्ये कृषी मालाला उत्तम मागणी निर्माण होऊ शकते. फक्त त्या



Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Science College,Motala

CURRENT GLOBAL REVIEWER
ISSN : 2319 – 8648 Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I, Vol II, 10th Feb. 2018

नविन बाजारपेठांचा शोध घेऊन तेथपर्यंत पोहचण्याची गरज आहे. यासाठी शासन यंत्रणेची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते. आज केवळ शेतीला पारंपारिक आव्हाने किंवा संकटांना सामोरे जावे लागत नसुन हवामान बदल, जागतिक तापमान वाढ, नैसर्गिक प्रकोप इत्यादी नविन संकटांचा सामना सुध्दा करावा लागणार आहे. जगामधील प्रमुख प्रगत राष्ट्रांमध्ये अतिप्रमाणात रासायनिक खतांचा वापर करुन जमीनीची उत्पादकता व गुणवत्ता खालावली आहे व भारताजवळ पूर्वीपासून चालत आलेल्या सेंद्रिय शेतीच्या संकल्पनेला प्रोत्साहन देऊन जगात कृषी निर्यातीमध्ये अग्रस्थान प्राप्त करता येते.

ज्या प्रमाणे सिक्कीम या घटकराज्याने देशात सर्वात अगोदर संपूर्ण सेंद्रिय शेती करण्याचे धाडसी पाऊलउचलले आहे त्याप्रमाणे देशातील अन्य घटकराज्यांनी या बाबीचे अनुकरण करणे आवश्यक आहे. शेतीला आज व्यवसाय म्हणून पाहणे अधिक गरजेचे आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै.यशवंतराव चव्हाण यांचे शेती संदर्भात एक वाक्य आहे. त्यांच्या मते 'शेती हा शंभर तोंडाचा राक्षस आहे.' त्यामधून शेतीची सुटका करण्यासाठी भारतामधील सर्व कृषी पदवीधर, कृषी पदविकाधारक विद्यार्थ्यांना शेतीमध्ये रोजगार मिळणे गरजेचे आहे. कारण 2017 'असर' च्या अहवालानुसार 14 ते 18 वयोगटातील ग्रामीण भागातील 78% मुले शाळेत जात असोत अथवा नसोत त्यांना शेतीत जावेच लागते. मात्र यापैकी कोणालाच कृषी पदवीधर, पशू वैद्यकीय, जैवतंत्रज्ञान क्षेत्रात करीअर करण्याची आशा अथवा आकांक्षा नाही. त्याचबरोबर देशभरात पदवी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये कृषी पदवीधर वा पशूवैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे प्रमाण केवळ अर्धा टक्का आहे. जागतिकीकरणातील संधीचा फायदा घ्यावयाचा असल्याने कृषी क्षेत्रातील शिक्षणावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. मुक्त अर्थव्यवस्थेचा 30 वर्षांचा लेखा-जोखा घेतल्यास वर्तमानकाळात सुध्दा आपण स्पर्धा करण्यास पुर्णपणे सुसज्ज नाही. आज जगात मुक्त अर्थव्यवस्थेचा डंका पिटला जातो. मात्र अजूनही अनेक छुपे प्रतिबंध प्रत्येक राष्ट्राने आप-आपल्यापरीने लावलेले दिसतात. आज प्रत्येक क्षेत्रात अनेक समस्या का आहेत त्या करिता ऑस्कर वाईल्ड यांच्या शब्दांत 'आजकाल प्रत्येक वस्तूची किंमत लोकांच्या लक्षात येते, परंतु कशाचेही मुल्य लक्षात येत नाही.'

**संदर्भ ग्रंथ :-**

1) भारतीय अर्थव्यवस्था :- दत्त-सुंदरम 2012 ची आवृत्ती
2) जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय :- श्री.गजानन खातू, अक्षर प्रकाशन मुंबई 2004
3) भारतीय अर्थव्यवस्था :- डॉ.जी.एन.झामरे, पिंपळपुरे प्रकाशन, नागपूर 2016
4) विश्वाचे आर्त :- अतुल देऊळगावकर, मनोविकास प्रकाशन, पुणे 2014
5) मासिके :- योजना :- जानेवारी 2011
6) वर्तमानपत्र :- लोकसत्ता :- 21 जानेवारी 2018



Principal
Shri Shivaji Arts, Commerce
& Science College

MSP Mandal's,

# R.B. Attal Arts, Science and Commerce College,

Georai, Dist: Beed.(M.S.) India

Organized

## One Day Interdisciplinary National Seminar

On

| | | |
|---|---|---|
| **Globalization** | : | **Literature & Society** |
| वैश्वीकरण | : | साहित्य और समाज |
| जागतिकीकरण | : | साहित्य आणि समाज |

**10th February, 2018**

# Certificate

This is to Certify that Mr./Mrs./Prof./Dr. डॉ. पी. आर. चाटे

Of श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा

Participated / Presented research paper/ as a Resource Person / as a Chairperson

entitled जागतिकीकरण आणि भारतीय कृषि व्यवस्था

In the National Seminar, on "**Globalization: Literature & Society**"

Organized by R.B. Attal College Georai.

Principal

Principal
Shri Shivaji Arts, Commerce
& Science College, Motala

129

बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी, खामला, नागपूर द्वारा संचालित

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

जि. नागपूर - ४४१२०१

Accredited with Grade B (CGPA-2.54) by NAAC, Bengaluru

# विदर्भ अर्थशास्त्र परिषद

## ४३ वे वार्षिक अधिवेशन

दि. २ आणि ३ फेब्रुवारी २०१९

## प्रमाणपत्र

श्री/श्रीमती/प्रा./डॉ. : पुरुषोत्तम रंगराव चाटे

महाविद्यालयाचे नाव : शिवाजी कॉलेज, मोताळा जि. बुलढाणा।

यांनी दोन दिवसीय वार्षिक अधिवेशनामध्ये सहभाग घेतला, तसेच त्यांनी जागतिकीकरण व भारतीय शेती. या विषयावर शोधनिबंध सादर केला. करीता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| डॉ. अंजली कुलकर्णी | डॉ. विठ्ठल घिनमिने | डॉ. सुनिल शिंदे | डॉ. राजेंद्र भांडवलकर | डॉ. जोबी जॉर्ज |
|---|---|---|---|---|
| कार्याध्यक्ष | सचिव | स्थानिक सचिव | अध्यक्ष | प्राचार्य |
| (विदर्भ अर्थशास्त्र परिषद) | (विदर्भ अर्थशास्त्र परिषद) | (विदर्भ अर्थशास्त्र परिषद) | (विदर्भ अर्थशास्त्र परिषद) | (भिवापूर महाविद्यालय, भिवापूर) |

Principal
Shri Shivaji Arts, Commerce
& Science College, Motala

130